# प्रकरण सहावे

# -: सारांश :-

## प्रकरण सहावे

## -: सारांश :-

### प्रास्तविक:

अंकलखोप सहकारी पतसंस्थेचा हा अभ्यास प्रामुख्याने दोन टप्प्यात केलेला आहे. प्रकरण दोनमध्ये विभाग दोन, तीन आणि चार या घटकांमध्ये अंकलखोप सहकारी पतसंस्थेच्या ऐतिहासिक बदलांचा १९२२ ते १९४० हा पहिला कालखंड व १९४० ते १९६० हा दुसरा कालखंड आणि १९६० ते १९७० अशा तीन कालखंडात अभ्यास केलेला आहे. या अभ्यासावरून काही महत्वाचे निष्कर्ष निघतात ते थोडक्यात पुढीलप्रमाणे मांडता येतील.

१) १९२२ ते १९४० या कालखंडात सभासदसंख्या वाढण्याऐवजी कमी झाली. याच कालखंडात संस्थेच्या भागभांडवलाची वाढ होऊ शकली नाही. तसेच संस्थेच्या ठेवी जवळजवळ कुंठीतच होत्या कारण १९२४-२५ ला एकूण ठेवी रू.१५२० च्या होत्या तर १९३९-४० मध्ये एकूण ठेवी रू.१६०० इतक्याच होत्या व त्यातही रू.२८५ या इतर सभासदांच्या ठेवी होत्या. तुलनात्मकदृष्टया या काळात संस्थेच्या राखीव निधीमध्ये मात्र ब-यापैकी वाढ झालेली दिसते. याच कालखंडात संस्थेकडून जो कर्जपुरवठा करण्यात आला त्यामध्ये सतत चढउतार झालेले दिसतात व १९३५ नंतर हा कर्जपुरवठा एकदम कमी झालेला दिसतो. संस्थेच्या कर्जपुरवठ्यात ५० टक्के हिस्सा सभासदांचा दिसतो व ५० टक्के कर्जपुरवठा करंट खात्यावर केलेला दिसतो. १९२४ ते १९४० या काळात संस्थेने मध्यवर्ती सहकारी बँकेकडून घेतलेल्या कर्जामध्ये घटती प्रवृत्ती दिसून येते. हाच प्रकार खेळत्या भांडवलाच्या बाबतीत देखील दिसून येतो. १९२२ ते १९४० याकाळात ही संस्था फक्त कर्जपुरवठाच करीत होती. त्यामुळे संस्थेचा नफा मर्यादित

होता आणि मिळणारा बहुतांश नफा राखीव निधीमध्ये जमा केला जात होता. एकंदरीत पाहता १९२२ ते १९४० हा कालखंड स्थापनेनंतर निर्माण झालेला व बरीच वर्षे टिकलेला कुंठीतावस्थेचा होता असेच म्हणावे लागेल.

१९४० ते १९६० या कालखंडात मात्र या संस्थेची जोमाने प्रगती झालेली दिसते. विशेषत: १९५६ पासून पुढच्या काळात या संस्थेची अधिक भरीव वाढ झालेली दिसते. त्यामध्ये सांगली येथील शेतकरी सहकारी साखर कारखान्याची स्थापना हा सर्वात महत्वाचा घटक ठरतो. त्याचबरोबर १९५७-५८ मध्ये संस्थेला ५ हजार रूपयांचे सरकारी भांडवलही मिळाले. साखर कारखान्याच्या स्थापनेमुळे ऊसशेतीचे प्रमाण वाढत गेले. परिणामत: पीककर्ज म्हणून त्याचबरोबर रासायनिक खतांच्यासाठी कर्ज म्हणून अंकलखोप गावचे शेतकरी संस्थेकडून मोठयाप्रमाणावर कर्ज घेऊ लागले. याचा आणखी एक परिणाम असा झाला की संस्थेचे कार्य फक्त पतपुरवठा एवढेच न राहता त्याच्या जोडीला खतविक्री आणि तेलविक्री असे दोन नवीन विभाग संस्थेने सुरू केले. तक्ता क्रमांक २.७ लक्षात घेतला तर १९५८ ते १९६० या दोनच वर्षात सभासदसंख्या, भागभांडवल, बँककर्ज, कर्जपुरवठा, गुंतवणूक, कर्जवसूली आणि नफा या सर्वच बाबतीत संस्थेची एकदम प्रगती झालेली दिसते.

१९६० ते १९७० या काळात संस्थेची प्रगती आणखी झपाटयाने झालेली दिसते. विशेषत: ऊसउत्पादक सभासदांचे प्रमाण वाढत गेल्यामुळे आणि अशा सभासदांनी घेतलेल्या कर्जाची परतफेड साखर कारखाना बिलातून परस्पर होवू लागल्यामुळे संस्थेची आर्थिक परिस्थिती अधिक सुस्थिर व बळकट होत गेली. याच कालखंडात १९६० मध्ये संस्थेने खत विभाग आणि तेलविभाग यांच्याच जोडीला ग्राहक भांडारही स्थापन केले. तसेच १९६२-६३ पासून संस्थेने विमा एजन्सीही घेतली. सहकारी संस्थेने विमा एजन्सी घेण्याचा हा पहिलाच अभिनव प्रयोग होता. यापैकी संस्थेचा खतविभाग सातत्याने

प्रगती पथावर असलेला दिसतो. कारण ऊस उत्पादनासाठी रासायनिक खतांचा वापर मोठया प्रमाणात करावा लागतो आणि संस्थेकडून केल्या जाणा-या कर्जपुरवठयातला मालस्वरूपी हिस्सा खतांच्या माध्यमातून दिला जातो. तेलविभागाच्या बाबतीत मात्र १९६५ नंतर घट झालेली दिसते व त्याचे प्रमुख कारण म्हणजे वाढते विद्युतीकरण व उपसा जलसिंचन योजनेसाठी विद्युतपंपाचा वाढत्या प्रमाणात होत गेलेला वापर होय. ग्राहक भांडाराची नफ्याची अवस्था फारशी आकर्षक नसली तरी ग्राहक भांडाराचा उपयोग स्थानिक लोक मोठया प्रमाणात करू लागले होते हे त्या विभागाच्या वाढत्या, उलाढालीवरून दिसते. १९६० ते १९७० या कालखंडात संस्थेची झालेली भरीव प्रगती पुढील तक्त्यावरून सहज स्पष्ट होते.

तक्ता क्रमांक ६.१

-: १९६० ते १९७० या काळातील संस्थेची प्रगती :-

- कांही दर्शक -

| क्र. | दर्शक | वार्षिक वृध्दीदर |
|---|---|---|
| १) | सभासदसंख्या | १६.३ टक्के |
| २) | भागभांडवल | ३५.५ टक्के |
| ३) | ठेवी | ७१.६ टक्के |
| ४) | कर्जपुरवठा | १८.४ टक्के |
| ५) | खेळते भांडवल | २२.४ टक्के |
| ६) | नफा | ७७.२ टक्के |
| ७) | थकबाकी | ०.६७ टक्के |

२) सन १९७०-७१ ते १९८५-८६ या कालखंडात संस्थेची आणखी झपाटयाने जशी वाढ झालेली दिसते, तसेच संस्थेच्या कांही विभागांचे कामकाज बंदही झालेले दिसते. या कालखंडात संस्थेने ट्रॅक्टर विभाग व तेलविभाग बंद केलेले दिसून येतात. तथापि याच कालखंडात संस्थेच्या ग्राहक भांडाराचे - ग्राहक भांडार क्रमांक १ (रेशन) व ग्राहक भांडार क्रमांक २ (किराणा) असे स्वतंत्र भाग पडलेले दिसतात. त्याचबरोबर स्थानिक लोकांच्या सोयीसाठी १९७४ मध्ये कापड विभाग व १९७७ मध्ये औषध विभाग तर १९८२ मध्ये भांडी विभाग तसेच स्टेशनरी व कटलरी विभाग अशा नवीन क्षेत्रात संस्थेने यशस्वीपणे प्रवेश केलेला दिसतो.

३) १९७०-७१ ते १९८५-८६ या काळातील संस्थेची प्रगती पुढीलप्रमाणे मांडता येईल.

तक्ता क्रमांक ६.२

-: १९७०-७१ ते १९८५-८६ या काळातील संस्थेच्या प्रगतिचे दर्शक :-

| क्र. | दर्शक | वार्षिक वृध्दीदर |
|---|---|---|
| १) | सभासदसंख्या | २.७१ टक्के |
| २) | भागभांडवल | ६.६२ टक्के |
| ३) | ठेवी | ९.५४ टक्के |
| ४) | कर्जपुरवठा | ७.४० टक्के |
| ५) | खेळते भांडवल | ७.४९ टक्के |
| ६) | निधी | १२.११ टक्के |
| ७) | थकबाकी | १४.४४ टक्के |
| ८) | नफा | ७.०९ टक्के |

४) संस्थेचे सर्व व्यवहार कार्यक्षमतेच्यादृष्टीने चांगले आहेत याचा पुरावा कर्जवसूलीचे प्रमाण ९० टक्केपेक्षा अधिक असणे, तसेच थकबाकीचे प्रमाण अल्प व घटते असणे आणि संस्थेला सातत्याने सोळाही वर्षे ऑडीटचा " अ " वर्ग मिळणे यासारख्या गोष्टीतून व्यक्त होतो.

५) संस्थेची मांडवली रचना संस्थेच्या स्वतंत्र विकासाला पूरक व समर्थ आहे याचा पुरावा पुढील तक्त्यावरून मिळू शकतो.

तक्ता क्रमांक ६.३

-: संस्थेची मांडवली रचना :-

| क्र. | तपशील | १९८१-८२ | | १९८५-८६ | |
|---|---|---|---|---|---|
| | | रक्कम | % प्रमाण | रक्कम | % प्रमाण |
| १) | भागभांडवल | २४०८३२० | २५.६८ | २९२७९०० | २७.२४ |
| २) | एकूण निधी | ९९२७२३ | १०.५९ | १३७०३५७ | १२.७५ |
| ३) | एकूण ठेवी | ६८०२१८ | ७.२५ | ९०१५९० | ८.३९ |
| ४) | घेतलेली कर्जे | ५२९६१७७ | ५६.४८ | ५५४८०९६ | ५१.६२ |
| एकूण ( १+२+३+४) | | ९३७७४३८ | १००.०० | १०७४७९४३ | १००.०० |

६) संस्थेच्या कर्जपुरवठयाची रचना संस्थेच्या कर्जपुरवठयामध्ये अल्पमुदतीच्या कर्जपुरवठयाचे प्रमाण नेहमीच जास्त आहे. तथापि १९७०-७१ च्या तुलनेने नंतरच्या काळात मध्यममुदती कर्जाचे प्रमाण वाढत गेलेले आहे हेही स्पष्ट दिसून येते. यावरून सभासद शेतकरी आपल्या शेतीमध्ये आधुनिक पध्दतींचा अधिकाधिक वापर करीत आहे असा निष्कर्ष मांडता येतो. संस्थेच्या कर्जपुरवठयाची रचना तक्ता क्रमांक ६.४ वरून लक्षात येईल.

## तक्ता क्रमांक ६.४

### -: संस्थेच्या कर्जपुरवठयाची रचना :-

| क्र. | कर्जपुरवठयाचा प्रकार | १९७१-७२ रक्कम | १९७१-७२ प्रमाण | १९८१-८२ रक्कम | १९८१-८२ प्रमाण | १९८५-८६ रक्कम | १९८५-८६ प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | अल्पमुदती | २४९३५७४ | ८४.३३ | ५०३०९३३ | ८४.८५ | ३६४९६६० | ५४.७२ |
| २) | मध्यममुदती | ४६३५९५ | १५.६७ | ८९७९६० | १५.१५ | ३०१९८४७ | ४५.२८ |
| ३) | एकूण (१-२) | २९५६६१८ | १००.०० | ५९२८८९३ | १००.०० | ६६६९५०७ | १००.०० |

वरील सारांशावरून कांही महत्वाचे निष्कर्ष मांडता येतात. ते पुढीलप्रमाणे:-

१) गांवपातळीवरील प्राथमिक शेती पतपुरवठा संस्था यशस्वी रितीने चालण्यासाठी संस्था समासदांच्या शेतीमध्ये नगदी पिकांचा हिस्सा मोठा असला पाहिजे.

२) अशा संस्थेची कर्जवसूली चांगली होण्यासाठी व थकबाकीचे प्रमाण अत्यल्प राहण्यासाठी संस्थेच्या समासदांचे शेती उत्पादन नियमितपणे वाजवी किंमतीस विकले जाण्याची सोय असणे आवश्यक आहे व या विक्रीशी संस्थात्मक पातळीवर कर्जवसूलीचा संबंध प्रस्थापित करणे अत्यंत उपयुक्त ठरते.

३) गांवपातळीवरील प्राथमिक सहकारी शेती पतपुरवठा संस्था प्रयत्न केल्यास विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्था होऊ शकते, पण त्यासाठी संस्थेच्या व्यवस्थापनामध्ये

योग्य प्रकारचे नेतृत्व दीर्घकाळ सातत्याने मिळण्याची आवश्यकता असते तसेच बदलत्या परिस्थितीत कोणते आर्थिक व्यवहार स्थानिक पातळीवर व्यापक मागणीचे आहेत हे समजून घेणेदेखील आवश्यक ठरते. एवढेच नव्हे तर तोटयात येणारे आर्थिक व्यवहार योग्यवेळी बंद करण्याचे निर्णय घेण्याचे धाडस संस्थेच्या नेतृत्वाला करावे लागते.

-0-0-0-